

श्री.जयदिप डाकरे सर श्री.प्रविण डाकरे सर

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe इयत्ता – चौथी (23 जुलै) माझा अभ्यास Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

# दिवस तेवीस :

CLICK HERE



गतवर्षीच्या क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट.

टेस्ट सोडवा

## वाचा व समजून घ्या.


## ५. मला शिकायचंय !

''दादाले सांगना ओ माय, माले पाचवीमा जावू द्या.... शिकू द्या.'' असं म्हणत स्नेहा पुन्हा रडायला लागली. सुलभाला गहिवरून आलं. तिचे डोळे पाणावले. नवऱ्याला कसं समजावून सांगावं हेच तिला समजेना.

गावात चौथीपर्यंत शाळा होती, म्हणून गावातील बरेच लोक मुलांना चौथीपर्यंत शिकवत होते. गरिबीमुळे मुलीला परगावी शिकवणं सखारामला अवघड वाटत होतं. सखारामच्या भाऊबंदांमध्ये पोरींना कुणीही चौथीच्या पुढे परगावी पाठवून शिकवलं नव्हतं. त्यामुळे तोही त्यांचाच कित्ता गिरवणार होता. त्याचा निर्णय पक्का होता.

स्नेहाच्या वर्गामधली बबली गावच्या सरपंचांची मुलगी होती. आडगावला जाऊन सरपंचांनी पाचव्या इयत्तेत बबलीला प्रवेश घेतला होता. स्नेहाला तिचे बाबा पुढे शिकवणार नाहीत, असं मुख्याध्यापकांना समजलं. सरपंचांना बरोबर घेऊन ते सखारामच्या घरी आले.

सरपंच अचानक आपल्या घरी आलेले पाहून सखारामला अचंबा वाटला. बबली स्नेहाकडे नेहमी येत असे. स्नेहा अत्यंत हुशार मुलगी म्हणून सरपंचांना तिचं मोठं कौतुक. ''कायद्याप्रमाणे मुलीला शिकवावंच लागेल. तुझी कोणतीही अडचण असली तरी आपण ती सोडवू, पण स्नेहाला पुढे शाळेत पाठव.'' सरपंच बोलले.



मान खाली घालून सखाराम उभा होता. मुख्याध्यापक पोटतिडकीनं बोलू लागले.

''सखाभाऊ, तुमची लेक हुशार आहे. तिनं शिष्यवृत्ती परीक्षा दिली आहे. तिला पुढे शिकवा. स्वावलंबी बनू द्या.''

सरपंच समजुतीच्या स्वरात म्हणाले, ''अरे सखा, तुन्ही पोरगी एवढीच मन्ही बबली. तिनाच वर्गामधनी. तिलेबी मी धाडणार शे ना... पाचवी इयत्तामा... अरे, आडगावनी शाय आठून अर्धा तासना अंतरवर शे... मन्हा लेक संगे जाईन ती एसटीमा.''

सखाराम विचारमग्न झाला होता.

''खरं सांग सखा, तुन्हा पिंटूले पाचवीमा धाडशीनच ना ? मंग पोरगीना बाबतमाच असा भेद कसाले? सांग सखाराम.''

सखाराम निरुत्तर झाला. मुख्याध्यापकांनी बोलायला सुरुवात केली.

## खालील संख्या सूचनेनुसार लिहा.

**२. संख्याज्ञान**

टेस्ट सोडवा

### संख्याचिन्हाचे वेगवेगळे अर्थ

ताई : ‘एकशे पंचवीस’ ही संख्या आपण अंकांत ‘१२५’ अशी लिहितो, म्हणजे ‘१२५’ हे ‘एकशे पंचवीस’ या संख्येसाठी वापरलेले एक चिन्ह आहे; पण या चिन्हाचे वेगवेगळे अर्थ होतात.

गौरी : एकाच चिन्हाचे वेगळे अर्थ ? कसं काय ?

ताई : गौरी, समज तुला तुझ्या मैत्रिणीला १२५ रुपये द्यायचे आहेत आणि तुझ्याकडे फक्त १ रुपयाची खूप नाणी आहेत, तर तू ते कसे देशील ?

गौरी : मी १ रुपयाची १२५ नाणी देईन.

ताई : म्हणजे १२५ या संख्याचिन्हाचा अर्थ ‘१२५ एकक’ असा होईल.
सुधीर, समज तुझ्याकडे फक्त १० रुपयांच्या काही नोटा आणि १ रुपयाची काही नाणी आहेत. तुला १२५ रुपये द्यायचे आहेत, तर तू ते कसे देशील ?

सुधीर : मी १० रुपयांच्या १२ नोटा आणि १ रुपयाची ५ नाणी देईन, म्हणजे मी दिलेल्या नाणी नोटांप्रमाणे, १२५ चा अर्थ १२ दशक ५ एकक असा होईल.

ताई : बरोबर. अजित समज तुझ्याकडे १०० रुपयांच्या काही नोटा, १० रुपयांच्या काही नोटा आणि १ रुपयाची काही नाणी आहेत. तुला १२५ रुपये द्यायचे, तर ते तू कसे देशील?

अजित : मी १०० रुपयांची एक नोट, १० रुपयांच्या दोन नोटा आणि १ रुपयाची ५ नाणी देईन. त्याप्रमाणे १२५ चा अर्थ १ शतक, २ दशक व ५ एकक असा होईल.

ताई : म्हणजे १२५ या संख्याचिन्हाचे तीन वेगवेगळे अर्थ आहेत, हे लक्षात घ्या.

१२५ = एकशे पंचवीस एकक

१२५ = बारा दशक पाच एकक

१२५ = एक शतक, दोन दशक व पाच एकक

आता ४०८३ या संख्याचिन्हाचे वेगवेगळे अर्थ तुम्हांला सांगता येतील का ?

सुधीर : एक अर्थ ‘चार हजार त्र्याऐंशी एकक’ असा होईल.

अजित : आणखी एक अर्थ ‘चारशे आठ दशक, तीन एकक’ असा होईल.

मलिका : आणखी एक अर्थ ‘चाळीस शतक, आठ दशक, तीन एकक’ असा होईल.

गौरी : अजून एक अर्थ ‘चार हजार, शून्य शतक, आठ दशक, तीन एकक’ असा होईल.

ताई : असे आणखीही वेगवेगळे अर्थ आपण सांगू शकतो.

### स्वाध्याय

खाली दिलेल्या संख्याचिन्हांचे वेगवेगळे अर्थ समजावून घ्या व लिहा.

(१) ६७९ (२) ८६३ (३) ६७४५ (४) ९८५६ (५) १०२७

टेस्ट सोडवा

Write the following numbers as instructed.

## 2. Number Work

### The different breakups of a number

**Tai** : We write the number 'one hundred and twenty-five' as 125, in figures. That is, 125 is a sign or symbol used for the number 'one hundred and twenty-five'. But we can break up this number in different ways.

**Gouri** : Different ways? How?

**Tai** : Now, Gouri, suppose you have to give your friend 125 rupees and all you have is a whole lot of one-rupee coins. How will you do it?

**Gouri** : I'll give her 125 one-rupee coins.

**Tai** : So, the number 125 means 125 units.

Sudhir, suppose you have several 10-rupee notes and some 1-rupee coins. You have to give ₹125. How will you do it?

**Sudhir** : I will give 12 ten-rupee notes and 5 one-rupee coins. So, according to the notes and coins I give, 125 means 12 tens and 5 units.

**Tai** : That's right. Ajit, suppose you have 100-rupee notes, 10-rupee notes and 1-rupee coins. You, too, have to give ₹125. How will you do it?

**Ajit** : I shall give one 100-rupee note, two 10-rupee notes and five 1-rupee coins. Here, 125 means 1 hundred, 2 tens and 5 units.

**Tai** : So, the number 125 can have three different breakups.

125 = one hundred and twenty-five units

125 = twelve tens, five units

125 = one hundred, two tens, five units

Now can you tell the different breakups of the number 4083?

**Sudhir** : One of the breakups is 'four thousands and eighty-three units.'

**Ajit** : Another breakup is '408 tens and 3 units.'

**Mallika** : Still another breakup is 'forty hundreds, eight tens and three units.'

**Gouri** : And yet another way is 'four thousands, zero hundreds, eight tens and three units.'

**Tai** : Thus we can have several different breakups of the same number.

### Exercise

Work out and write different breakups of the numbers given below.

(1) 679 (2) 863 (3) 6745 (4) 9856 (5) 1027

टेस्ट सोडवा

## Listen and sing. **revision**

**A Guessing Game**

**Listen carefully. Read the sentences in 'B' with me and play this game.**
लक्षपूर्वक ऐका. 'B' मधील वाक्ये माझ्याबरोबर वाचा आणि हा खेळ खेळा.

चित्र ओळखताना मुलांना 'B' मधील वाक्यांऐवजी प्रश्नही विचारता येतील. उदा., Is it white? Does it quack? etc.

**Teacher :** Form pairs.
Now, choose any picture from Table A.
Write the English word for it on a small piece of paper and fold it.
Let your friend guess the word with the help of the sentences in B.
When he/she guesses correctly, show the word.

**A**



**B**

| | | | |
|---|---|---|---|
| It is white. It quacks. | It grows on a tree. | It shines in the sky. It is hot. | She gives us milk. |
| It rhymes with 'pup'. | It is green. It flies. | They are small. They bite. | It has four legs and a top. |
| They fly in the sky. | It has a trunk and two big ears. | We cut vegetables with it. | It has three blades. |

पाठ वाचा व समजून घ्या.

टेस्ट सोडवा

## ३. साठवण पाण्याची

**(२) किल्ल्यांवरचे तलाव व टाक्या**

सराव



शिवनेरी किल्ल्यावरील तलाव

पूर्वी किल्ल्यांवर लोक राहायचे. त्यांनाही पाण्याची गरज होती. किल्ल्यांवर तलाव असायचे. त्याचबरोबर दगडात खणलेली पाण्याची टाकी असायची.



आड

**(३) आड –** पिण्याचे पाणी मिळवण्यासाठी पूर्वी आड खणले जायचे. त्यांचा घेर कमी असतो. दोरीला बांधलेले भांडे (पोहरा) टाकून त्यातून पाणी काढले जायचे.

सांगली जिल्ह्यात आटपाडी हे गाव आहे. या गावात पूर्वी प्रत्येक वाड्यात 'आड' होते. या आडांना वर्षभर पाणी असायचे. पुढे या गावाला नळाने पाणी पुरवले जाऊ लागले. त्यानंतर आडांचा वापर बंद झाला. ते बुजवले गेले. आता या गावात खूपच कमी आड उरले आहेत. अनेक गावांमध्ये असे झाले आहे.



नदीवरील बंधारा

**(४) नदी व बंधारा –** नदीचे पाणी अडवण्यासाठी नदीवर दगड किंवा मातीचे बांध/बंधारे बांधले जातात.

**(५) जुने तलाव**

कमी पावसाच्या भागात किंवा मोठी नदी नसलेल्या भागात पूर्वी तलाव बांधले जायचे. बहुतांश तलाव बांधण्यासाठी दगड व चुना वापरला जायचा.



नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथील एक तलाव



औरंगाबाद शहरातील हौद

**(६) जुने हौद –** पूर्वीच्या काळात पाणी साठवण्यासाठी हौद वापरले जायचे. मुख्यत: जुन्या काळातील मोठ्या शहरांमध्ये असे हौद आहेत. त्यांपैकी काही आजही वापरात आहेत.

**तुमच्या परिसरात पाणी साठवण्याच्या अशा जुन्या व्यवस्था आहेत का ते शोधा.**

# ३. मराठा सरदार – भोसल्यांचे कर्तबगार घराणे

**पाठ वाचा व स्वाध्याय सोडवा.** सराव

टेस्ट सोडवा

## स्वाध्याय

### १. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.

(अ) महाराष्ट्रातील शूर घराण्यांपैकी वेरूळचे ............ घराणे मोठे पराक्रमी निघाले.

(मोरे, घोरपडे, भोसले)

(आ) बाबाजीराजे भोसल्यांना मालोजी व ........ ही दोन मुले होती.

(विठोजी, शहाजी, शरीफजी)

(इ) निजामशहाचा ............ हा कर्तबगार वजीर होता.

(मलिक अंबर, फत्तेखान, शरीफजी)

### २. नातेसंबंध लिहा.

(अ) मालोजीराजे – विठोजीराजे ................

(आ) शहाजीराजे – लखुजीराव जाधव ...........

(इ) शहाजीराजे – शरीफजी ...................

(ई) बाबाजीराजे – विठोजीराजे .................

### ३. 'अ' गट व 'ब' गट यांच्या जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) सिंदखेडचे | (१) निंबाळकर |
| (आ) फलटणचे | (२) घोरपडे |
| (इ) जावळीचे | (३) भोसले |
| (ई) मुधोळचे | (४) मोरे |
| | (५) जाधव |

### ४. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) घृष्णेश्वराच्या मंदिराचा जीर्णोद्धार कोणी केला ?

(आ) निजामशहाने मालोजीराजांना कोणत्या परगण्यांची जहागीर दिली ?

(इ) निजामशाही वाचवण्यासाठी कोण निकराने लढले ?

(ई) आदिलशहाने शहाजीराजांना कोणता किताब दिला ?

(उ) शहाजीराजे आदिलशाही सोडून निजामशाहीत परत का आले ?

### उपक्रम

महाराष्ट्राच्या नकाशात अहमदनगर, फलटण, वेरूळ, पुणे, सुपे ही ठिकाणे दाखवा.

**टीप :** येथील 'मराठा' हा शब्द 'विशिष्ट जातीमधील व्यक्ती' या अर्थाचा नसून 'मराठी भाषा बोलणारे' वा 'महाराष्ट्रीय' या अर्थाचा आहे.

CKHHAZ

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here